“स्वच्छ सर्वेक्षण-२०१८” व “स्वच्छ सर्वेक्षण-२०१९” मध्ये उच्चतम कामगिरी करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रोत्साहनात्मक बक्षिसाच्या निधीचे वितरण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय, क्रमांकः नपावै-२०१९/प्र.क्र.९४/नवि-१६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक: २५ जुलै, २०१९

वाचा :- (१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक स्वमअ- २०१५/प्र.क्र.२३/नवि-३४, दिनांक १५ मे, २०१५

(२) शासन निर्णय,नगर विकास विभाग,क्रमांक स्वमअ २०१७/प्र.क्र.२६४/नवि-३४, दि. ३० डिसेंबर,२०१७

(३) शासन निर्णय,नगर विकास विभाग,क्रमांक स्वमअ २०१९/प्र.क्र.९३/नवि-३४, दि. २५ जुलै, २०१९

(४) शासन निर्णय,नगर विकास विभाग,क्रमांक स्वमअ २०१९/प्र.क्र.९४ /नवि-३४, दि. २५ जुलै, २०१९

प्रस्तावना:-

केंद्र शासनामार्फत स्वच्छ भारत अभियानांतर्गत दरवर्षी करण्यात येत असलेल्या **“स्वच्छ सर्वेक्षण”** मध्ये राज्यातील सर्व **नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची** कामगीरी उच्चतम होण्याच्या दृष्टिने शहरांना प्रोत्साहन मिळावे म्हणून संदर्भिय क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये **“स्वच्छ सर्वेक्षण-२०१८”** करिता तसेच, संदर्भिय क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये **“स्वच्छ सर्वेक्षण-२०१९”** करिता प्रोत्साहनात्मक बक्षीस योजना जाहीर करून या प्रोत्साहनात्मक बक्षिस रकमेच्या वितरणाची कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे.

२. **“स्वच्छ सर्व्हेक्षण-२०१८”** चे सर्वेक्षण जानेवार २०१८ ते मार्च २०१८ या कालावधीत केंद्र शासनाने करून त्याचा निकाल दिनांक २३ जून, २०१८ रोजी जाहिर केला होता. तर, **“स्वच्छ सर्व्हेक्षण-२०१९”** चे सर्वेक्षण ०४ जानेवारी २०१९ ते ३१ जानेवारी, २०१९ या कालावधीत केंद्र शासनाने करून त्याचा निकाल मार्च, २०१९ मध्ये जाहीर करण्यात आला आहे. जाहीर झालेल्या निकालानुसार , संदर्भीय क्र. २ व ३ येथील शासन निर्णयानुसार प्रोत्साहन बक्षिसास पात्र ठरलेल्या नागरी स्थानिक संस्थांची संख्या पुढीलप्रमाणे आहे -

(१) **"स्वच्छ सर्व्हेक्षण-२०१८ (** बक्षिसासाठी पात्र एकूण ४९ नागरी स्थानिक स्वराज्य संस्था)

(अ) अमृत शहरे :-

गुणानुक्रम	प्रोत्साहन अनुदानाची रक्कम (रू. कोटी)	बक्षिसपात्र नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची संख्या
१ ते ३	२०	०
४ ते १०	१५	२
एकूण		२

(ब) नॉन-अमृत शहरे (पश्चिम विभागीय गुणानुक्रम):-

गुणानुक्रम	प्रोत्साहन अनुदानाची रक्कम (रू. कोटी)	बक्षिसपात्र नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची संख्या
१ ते ३	१५	३
४ ते १०	१०	६
११ ते ५०	५	३८
एकूण		४७

(२) **"स्वच्छ सर्व्हेक्षण-२०१९"** बक्षिसासाठी पात्र एकूण ३६ नागरी स्थानिक स्वराज्य संस्था)

(अ)अमृत शहरे :-

गुणानुक्रम	प्रोत्साहन अनुदानाची रक्कम (रू. कोटी)	बक्षिसपात्र नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची संख्या
१ ते ३	२०	०
४ ते १०	१५	१
एकूण		१

(ब) नॉन-अमृत शहरे (राष्ट्रीय पातळीवरील गुणानुक्रम)

गुणानुक्रम	प्रोत्साहन अनुदानाची रक्कम (रू. कोटी)	बक्षिसपात्र नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची संख्या
१ ते ३	१५	३
४ ते १०	१०	५
११ ते २५	५	१२
२६ ते ५०	२.५	१५
एकूण		३५

३. त्यानुसार, "स्वच्छ सर्वेक्षण-२०१८" व "स्वच्छ सर्वेक्षण-२०१९" मध्ये वरील प्रामणे उच्चत्तम कामगिरी करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रोत्साहनात्मक बक्षिसाचा निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचराधीन होती.

<u>शासन निर्णय :</u>

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून, "स्वच्छ सर्वेक्षण-२०१८" मधील प्रोत्साहनात्मक बक्षिसास पात्र ठरलेल्या ४९ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुज्ञेय एकूण रू. ३२५ कोटी बक्षिस रकमेच्या ५० % म्हणजे रू १६२.५० कोटी (रूपये एकशे बासष्ट कोटी पन्नास लक्ष फक्त) एवढा निधी व "स्वच्छ सर्वेक्षण-२०१९" मधील प्रोत्साहनत्मक बक्षिसास पात्र ठरलेल्या ३६ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुज्ञेय एकूण रू. २०७.५० कोटी बक्षिस रकमेच्या ५० % म्हणजे रू १०३.७५ कोटी (रूपये एकशे तीन कोटी पंच्याहत्तर लक्ष फक्त), **अशा प्रकारे दोन स्वच्छ सर्वेक्षणामधील एकूण ६२ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सोबतच्या विवरणपत्रातील रकाना १० मध्ये दर्शविल्यानुसार एकूण रू.२६६.२५ कोटी** (रूपये दोनशे सहासष्ट कोटी पंचवीस लक्ष फक्त) **एवढा निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देत आहे.**

२. आयुक्त तथा संचालक, नगरपलिका प्रशासन यांचेकडे यापूर्वी वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत (२२१७ १३०१) सन २०१८-२०१९ करीता आहरीत करून ठेवलेले रक्कम रू.२१५.१३ कोटी (रू.८०.२५ कोटी+ रू.१२०.८८ कोटी+रू.१४.०० कोटी) तसेच सन २०१९-२०२० करीता वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत (२२१७ १३०१) नव्याने वितरीत करण्यात येत असलेले रू.५१.१२ कोटी असे एकूण रू. २६६.२५ कोटी आयुक्त तथा

संचालक, नगरपलिका प्रशासन यांनी सोबतच्या विवरणपत्रातील रकाना १० मध्ये दर्शविल्या प्रमाणे प्रोत्साहनात्मक बक्षिसाचा निधी संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बँक खात्यात RTGS व्दारे त्वरीत वर्ग करावा.

३. संदर्भिय क्रमांक ३ येथील शासन निर्णयात नमूद केल्यानुसार स्वच्छ सर्वेक्षण-२०१८ व स्वच्छ सर्वेक्षण- २०१९ मधील उर्वरित ५०% निधीचा दुसरा हप्ता, अृमत शहरांच्या बाबतीत त्या शहराने किमान ओडीएफ+ दर्जा व ३ स्टार मानांकन प्राप्त् करून, स्वच्छ सर्वेक्षण-२०२० मध्ये राष्ट्रिय पातळीवर १ ते १० मध्ये आल्यानंतर अनुज्ञेय होईल. तर, नॉन अमृत शहरांच्या बाबतीत त्या शहराने किमान ओडीएफ+ दर्जा व ३ स्टार मानांकन प्राप्त् करून, स्वच्छ सर्वेक्षण-२०२० मध्ये राष्ट्रिय पातळीवर १ ते ५० मध्ये आल्यानंतर अनुज्ञेय होईल.

४. **नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणाऱ्या या प्रोत्साहनात्मक बक्षिसांच्या रकमेचा विनियोग संदर्भिय क्रमांक ४ येथील दिनांक २५ जुलै, २०१९ च्या शासन निर्णयात विहित केलेल्या बाबींवरच होईल याची दक्षता संबंतिधत आयुक्त, महानगरपालिका तसेच, मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत यांनी घ्यावी.**

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२५१५३७२१०५२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vivek Shankar Kumbhar

Digitally signed by Vivek Shankar Kumbhar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ef935067970760fbaec2fa421af2eac23d3b8737b990883be0d8ef292ba28a2f, serialNumber=5e3716fd0fe61ee87305882bc35ee7e757293849e74351e2ab33e4eb40bfb646, cn=Vivek Shankar Kumbhar
Date: 2019.08.02 15:39:26 +05'30'

(विवेक कुंभार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन,मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.राज्यमंत्री (नगर विकास), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
५. विभागीय आयुक्त, महसूल विभाग, (सर्व)
७. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद संचालनालय, वरळी, मुंबई
८. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

९. जिल्हाधिकारी (सर्व)

१०. मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत (सर्व)

११. राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान(नागरी) मुंबई

१२. निवड नस्ती (नवि-१६)

शासन निर्णय क्रमांक - नपावै-२०१९/प्र.क्र. ९४/न.वि.-१६ दिनांक २५ जुलै, २०१९
सोबतचे विवरणपत्र

अ. क्र.	जिल्हा	मनपा/नपा/ नगरपंचायत	स्वच्छ सर्वेक्षण २०१८ मधील पश्चिम विभागीय गुणानुक्रम	स्वच्छ सर्वेक्षण २०१९ मधील राष्ट्रीय गुणानुक्रम	स्वच्छ सर्वेक्षण - २०१८		स्वच्छ सर्वेक्षण - २०१९		
					पुरस्काराची एकूण रक्कम	पुरस्कार रकमेचा पहिला हप्ता	पुरस्काराची एकूण रक्कम	पुरस्कार रकमेचा पहिला हप्ता	एकूण पहिल्या हप्त्याचे वितरण रू. (कोटी)
१	**२**	**३**	**४**	**५**	**६**	**७**	**८**	**९**	**१०**
१	ठाणे	नवी मुंबई	९	७	१५.००	७.५०	१५.००	७.५०	**१५.००**
२	पुणे	पुणे	१०	३७	१५.००	७.५०	०.००	०.००	**७.५०**
३	सातारा	कराड	२५	१	५.००	२.५०	१५.००	७.५०	**१०.००**
४	पुणे	लोणावळा	५	२	१०.००	५.००	१५.००	७.५०	**१२.५०**
५	चंद्रपूर	मूल	३०	३	५.००	२.५०	१५.००	७.५०	**१०.००**
६	सांगली	विटा	१४	४	५.००	२.५०	१०.००	५.००	**७.५०**
७	कोल्हापूर	पन्हाळा	४६	६	५.००	२.५०	१०.००	५.००	**७.५०**
८	सातारा	महाबळेश्वर	११	८	५.००	२.५०	१०.००	५.००	**७.५०**
९	कोल्हापूर	मलकापूर	४	९	१०.००	५.००	१०.००	५.००	**१०.००**
१०	पुणे	इंदापूर	४५	१०	५.००	२.५०	१०.००	५.००	**७.५०**
११	कोल्हापूर	वडगांव कसबा	१२	११	५.००	२.५०	५.००	२.५०	**५.००**
१२	पुणे	सासवड	१८	१२	५.००	२.५०	५.००	२.५०	**५.००**
१३	सातारा	पांचगणी	१	१३	१५.००	७.५०	५.००	२.५०	**१०.००**
१४	सांगली	उरण इस्लामपूर	९	१४	१०.००	५.००	५.००	२.५०	**७.५०**
१५	नागपूर	मौदा	३३	१९	५.००	२.५०	५.००	२.५०	**५.००**
१६	सांगली	तासगांव	४१	२२	५.००	२.५०	५.००	२.५०	**५.००**
१७	रत्नागिरी	रत्नागिरी	२६	२३	५.००	२.५०	५.००	२.५०	**५.००**
१८	नागपूर	काटोल	३	२५	१५.००	७.५०	५.००	२.५०	**१०.००**
१९	कोल्हापूर	गडहिंग्लज	३८	२७	५.००	२.५०	२.५०	१.२५	**३.७५**
२०	रायगड	महाड	१५	३१	५.००	२.५०	२.५०	१.२५	**३.७५**
२१	हिंगोली	हिंगोली	३९	३३	५.००	२.५०	२.५०	१.२५	**३.७५**
२२	पुणे	भोर	७	३४	१०.००	५.००	२.५०	१.२५	**६.२५**
२३	औरंगाबाद	वैजापूर	१३	४२	५.००	२.५०	२.५०	१.२५	**३.७५**
२४	सिंधुदुर्ग	वेंगुर्ला	१०	४७	१०.००	५.००	२.५०	१.२५	**६.२५**
२५	अहमदनगर	शिर्डी	२	१९०	१५.००	७.५०	०.००	०.००	**७.५०**

अ. क्र.	जिल्हा	मनपा/नपा/ नगरपंचायत	स्वच्छ सर्वेक्षण २०१८ मधील पश्चिम विभागीय गुणानुक्रम	स्वच्छ सर्वेक्षण २०१९ मधील राष्ट्रीय गुणानुक्रम	स्वच्छ सर्वेक्षण - २०१८		स्वच्छ सर्वेक्षण - २०१९		
					पुरस्काराची एकूण रक्कम	पुरस्कार रकमेचा पहिला हप्ता	पुरस्काराची एकूण रक्कम	पुरस्कार रकमेचा पहिला हप्ता	एकूण पहिल्या हप्याचे वितरण रू. (कोटी)
२६	लातूर	औसा	६	७०	१०.००	५.००	०.००	०.००	**५.००**
२७	पुणे	जून्नर	१२९	१५	०.००	०.००	५.००	२.५०	**२.५०**
२८	कोल्हापूर	मुरगुड	२३०	१६	०.००	०.००	५.००	२.५०	**२.५०**
२९	सोलापूर	पंढरपूर	८९	१७	०.००	०.००	५.००	२.५०	**२.५०**
३०	सांगली	खानापूर	नवीन	२४	०.००	०.००	५.००	२.५०	**२.५०**
३१	चंद्रपूर	भद्रावती	८३	२६	०.००	०.००	२.५०	१.२५	**१.२५**
३२	रायगड	खोपोली	१५२	२८	०.००	०.००	२.५०	१.२५	**१.२५**
३३	कोल्हापूर	कागल	९५	२९	०.००	०.००	२.५०	१.२५	**१.२५**
३४	सातारा	कोरेगांव	नवीन	३६	०.००	०.००	२.५०	१.२५	**१.२५**
३५	सांगली	पलूस	१०४	३७	०.००	०.००	२.५०	१.२५	**१.२५**
३६	सातारा	रहिमतपूर	५६	३८	०.००	०.००	२.५०	१.२५	**१.२५**
३७	सोलापूर	मंगळवेढा	२२०	४१	०.००	०.००	२.५०	१.२५	**१.२५**
३८	नागपूर	कुही	नवीन	४६	०.००	०.००	२.५०	१.२५	**१.२५**
३९	धुळे	शिरपूर-वरवडे	६३	४९	०.००	०.००	२.५०	१.२५	**१.२५**
४०	औरंगाबाद	सिल्लोड	१६	२३६	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**
४१	रायगड	माथेरान	१७	२५४	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**
४२	औरंगाबाद	पैठण	१९	१४५	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**
४३	बीड	माजलगांव	२०	१८८	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**
४४	रायगड	मुरूड	२१	१४१	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**
४५	सिंधुदुर्ग	कणकवली	२२	१३३	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**
४६	अमरावती	शेंदुरजणाघाट	२४	८६	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**
४७	नांदेड	देगलूर	२७	१७५	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**
४८	जळगांव	जामनेर	२८	३८४	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**
४९	नागपूर	मोवाड	२९	२३०	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**
५०	उस्मानाबाद	तुळजापूर	३१	८७३	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**
५१	बीड	गेवराई	३२	१०७	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**
५२	जालना	भोकरदन	३४	४६१	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**
५३	परभणी	मानवत	३५	३४५	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**
५४	यवतमाळ	पांढरकवडा	३६	२४६	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**

अ. क्र.	**जिल्हा**	**मनपा/नपा/ नगरपंचायत**	**स्वच्छ सर्वेक्षण २०१८ मधील पश्चिम विभागीय गुणानुक्रम**	**स्वच्छ सर्वेक्षण २०१९ मधील राष्ट्रीय गुणानुक्रम**	**स्वच्छ सर्वेक्षण - २०१८**		**स्वच्छ सर्वेक्षण - २०१९**		
					पुरस्काराची एकूण रक्कम	**पुरस्कार रकमेचा पहिला हप्ता**	**पुरस्काराची एकूण रक्कम**	**पुरस्कार रकमेचा पहिला हप्ता**	**एकूण पहिल्या हप्याचे वितरण रू. (कोटी)**
५५	सोलापूर	सांगोले	३७	३९९	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**
५६	रायगड	कर्जत	४०	६९	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**
५७	सिंधुदुर्ग	सावंतवाडी	४२	६२	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**
५८	कोल्हापूर	जयसिंगपूर	४३	४१४	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**
५९	नाशिक	भगूर	४७	२२०	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**
६०	जळगांव	वरणगांव	४८	११२	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**
६१	पालघर	जव्हार	४९	२७०	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**
६२	सिंधुदुर्ग	मालवण	५०	५१	५.००	२.५०	०.००	०.००	**२.५०**
एकूण रक्कम रू. (कोटी)					**३२५.००**	**१६२.५०**	**२०७.५०**	**१०३.७५**	**२६६.२५**